**<u>स्पे. दि. मु. क्र. ११/२०१६</u>**

सुलतान फारुक पटेल ..... **वादी**
वि.
मारुफ सरदारअली काझी .... **प्रतिवादी**

**<u>नि. ११ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचेविरुद्ध झालेला प्रकरण एकतर्फा चालविणेचा आदेश रद्द होणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादींनी म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध केला आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी यांचे वकिलांचे निवेदन असे की, प्रतिवादी हे दवाखान्यात गेले असता बेलिफ यांनी त्यांचे घरी जावून सदर समन्स बजावणीचा प्रयत्न केला व प्रतिवादी यांची पत्नी अशिक्षीत असल्याने तिला याबाबत माहिती नसल्याने तिने ते समन्स घेतले नाहीत. प्रस्तुतचा आदेश रद्द न झाल्यास प्रतिवादींचे मोठे नुकसान होणार आहे. वादींचे वकिलांचे निवेदन असे की, प्रतिवादी यांनी अर्जामध्ये दिलेले कारण संयुक्तिक नसल्याने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा.

४. मूळ दावा रक्कम वसुलीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात वादींनी प्रतिवादींविरुद्ध अनेक तक्रारी उपस्थित केलेल्या आहेत. त्या तक्रारींना उत्तर देण्याची व बचाव मांडण्याची संधी प्रतिवादी यांना देणे गरजेचे आहे. अशी संधी दिल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होईल. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे म्हणून मी खालील आदेश देतो.

## :: <u>आदेश</u> ::

१. प्रतिवादी यांचेविरुद्ध दि. ०५/०७/२०१६ रोजी झालेला प्रकरण एकतर्फा चालविणेचा आदेश रद्द केला आहे.

(न्यायासनावर अधिघोषीत केले)

करा़ड. **(प्र. अ. सवदीकर)**
दि. २२/११/२०१६ दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड

गणेश धों. जाधव,
लघुलेखक (नि. श्रे.)